# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 11/10/2012 (का.प.क्र.15) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिंनाक 11/10/2012 (का.प.क्र.15) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 11.35 वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (प्र),नगरसचिव श्री.ओ.सी.शिरसाट तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
03. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
04. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
05. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
07. स. श्री.मो.मुजीबोद्दीन करीमोद्दीन
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्री.खान अक्रम करीम खान
10. स. श्रीमती निलाताई देविदास जगताप
11. स. श्री.समिर सुभाष राजुरकर

<u>चर्चा :</u>

श्री.नारायण कुचे : नगरसचिव सभेला उपस्थित का नाही.

उपआयुक्त (प्र.) : मा.आयुक्ताचे प्रतिनिधी म्हणून मला तर श्री.शिरसाट यांना सचिव म्हणून बसण्याचे आदेश करण्यात आले आहे. श्री.शिरसाट हे 2-3 मिनिटात येत आहे.

मा.सभापती :तोपर्यत सभा तहकूब करयात येते.
वेळ 11-40 वा. पुन्हा सभा 11-45 वा.सुरू

श्री.नारायण कुचे :मुकूंदवाडी येथील गणेश विसर्जन विहिरीतील दुर्गधीयुक्त पाणी बाहेर काढावे नसता यानंतरही मानहानी होऊ शकते मा.आयुक्त व शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांना निदर्शनास आणून दिले कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :खुलासा करावा.

शहर अभियंता : पाणीपुरवठा अधिकारी यांना विहिरीतील पाणी काढण्या बाबत लेखी दिले मेडीकल विभागाची मदत घेण्याचे आदेशीत केले

श्री.नारायण कुचे :उद्या पासून त्या विहिरीतील स्वच्छता करण्याचे काम सुरू करावे.

कार्य.अभियंता : पाणी पुरवठा अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

श्री.नारायण कुचे :पेट्रोल डिझेज मशीन लावून पाणी उपसा करावे ड्रेनेजमध्ये सोडवू शकतो.

कार्य.अभियंता-इ व फ :लेखी आदेश संबधीत विभागाचे आलेले आहे तपासणी करून लगेच काम सुरू होईल.

मा.सभापती :ताबडतोब या पाण्याची विल्हेवाट लावण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :शहराला दोन दिवसा आड पाणी देतो तेही अर्धातास मोठी पाणीटंचाई असतांना काल माझ्या वार्डात पाईपलाईन फुटली पूर्ण शहराला एक वेळचे

पाणी देवू इतके पाणी वाया गेले.24 तासात कुणीही कर्मचारी येवून लिकिजेट बंद केले नाही कारण काय माहिती घ्यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :माझ्या वार्डात शिवाजी महाराज पुतळया जवळ लाईन लिकिजेस होते 15-20 टँकर पाणी दररोज वाया जाते 2 वर्षापासून ही परीस्थित असून 10 हजार खर्च केले तर लाखो लिटर पाणी वाया जाणार नाही

कार्य.अभियंता-(इ व फ) : स.सदस्य श्री.मुंडे यांनी उपस्थित केलेला प्रश्ना बाबत लगेच तपासणी करून कार्यवाही होईल स.सदस्य श्री.वैद्य यांनी जो मुद्या उपस्थित केला ते पाणी 700 मी.मी व्यासाची लाइनमधून जाते ही लाईन सकाळी 4 ते रात्री 12 वाजेपर्यत चालू असते सतत पुरवठा चालू असल्यामूळे बंद करता येत नव्हते लगेच तपासणी करून कार्यवाही करण्यात येईल.कन्ट्रोल करण्यास व्हॉल नाही.आता काम सुरू केले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :बंद करता येत नाही असे म्हणणे चूकीचे शहरात अर्धातास पाणी देवू शकत नाही लाखो लिटर पाणी वाया जाते व्यवस्था होत नाही.

मा.सभापती :200 ते 500 मी.पर्यंत एक व्हॉल असावा अत्यावश्यक वेळी लाईन बंद करता आली पाहिजे.

श्री.बाळासाहेब मुंडे :20-20 फुटाच्या लाईन टाकाव्या त्यावर कनेक्शन दयावे अनेक वेळा सांगितले कार्यवाही होत नाही स.नं. 69 मध्ये लाईनचे काम केले आता तेथे लिकिजेस होत नाही. सजेशन देतो त्याप्रमाणे काम होत नाही.

कार्य.अभियंता(इ व फ) :स.सदस्य यांनी जो प्रश्न उपसिथत केला 150 लाईनचा आहे कन्टीन्युव ती लाईन चालू असते.

मा.सभापती ::स.सदस्य श्री. बाळासाहेब मुंडे यांचे वार्डातील शिवाजी महाराज पुतळया जवळील लाईनवरील लिकीजेस बंद करावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :अनेक ठिकाणी पाईप लाईन फुटतात वॉल साठी खड्डे केले बुजवत नाही लोक जखमी होतात दोन दिवसाआड पाणी केले तर टाक्या भरतील असा दावा केला सर्वांनी सम्मती मिळाली असे असतांना विश्वभारती येथील टाकी भरली नाही ज्योतीनगर येथील टाकीत पाणी नसते एक टाकी भरते तर दुसरी हनुमान टेकडीच्या टाकीत पाणी नाही.

कार्य.अभियंता-(इ व फ) : पीरबाजार येथील 350 ची लाईन फुटली होती त्यामूळे टाकी भरली नाही.पहाडसींगपूरा येथील टाकी 3.50 मी.भरली होती.

मा.सभापती :एखादया ठिकाणी लाईन फुटली तर त्या त्या भागात पाणी देणेसाठी उपाययोजना केली पाहिजे.

कार्य.अभियंता-(ई व फ):1400 व 700 वेगवेगळया लाईन आहे एकत्रित असेल तर प्रेसरने पाणी येते 1400 ची लाईन स्वतंत्र चालू असल्यामूळे प्रेशर कमी आता विश्वभारती कॉलनी येथील टाकी भरून घेणार आहोत.

श्री.गिरजाराम हाळनोर :दोन दिवसाआड पाणी होवूनही टाक्या भरल्या जात नसेल तर पुर्वीप्रमाणे पाणी वितरीत करावे.

मा.सभापती :ज्योतीनगर,विश्वभारती कॉलनी व शहरातील सर्व पाण्याच्या टाक्या प्राधान्याने भराव्या व दोन दिवसाआड देण्यात येणारे पाणी रेग्युलर मिळेल याची दखल घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मनपाच्या कार्यालया अंतर्गत आयडीबीआय बँक असून या बँकेने शिप्टीग होणार म्हणून पत्र दिले या बँकेत कर्मचारी अधिकारी तसेच महापालिकेचे कर्मचा-यांचे पगार तसेच मानधन व इतर सर्व खाती आहेत ही बॅक येथून

| | |
|---|---|
| | शिप्ट झाल्यानंतर कर्मचारी तेथे जाऊ शकेल का हा खर्च परवडण्या सारखा नाही. मनपाने काय उपाययोजना केली. |
| मुख्यलेखाधिकारी | :बैंकेने शिप्ट होण्या बाबत नोटीस दिली मा.आयुक्ताच्या ही बाब निदर्शनास आणून दिली दरम्यानच्या काळात इतर बँकेशी संपर्क केला कोणतीही बँक येण्यास तयार नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : जसे आपण निविदा मागवतो त्याप्रमाणे एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस्ट मागवावे फिक्स डिपॉजीट करोडोचे असून जवळपस 10 हजार खाते आहे कोणतीही बँक येण्यास तयार राहिल. |
| मा.सभापती | :प्रशासनाने लेखी या बाबतीत काय प्रयत्न केले. |
| मुख्यलेखाधिकारी | :ॲक्सीस तसेच एसबीएच बँकेशी चर्चा केली कोणीही येण्यास सम्मती दर्शविली नाही.जी बँक जास्त इन्ट्रेस देईल ती बॅक आणण्याचा प्रयत्न राहिल. |
| मा.सभापती | :येथील आयडीबीआय बँक शिप्ट होणार असल्याने इतर बँक येणेसाठी निविदा पध्दतीने एक्सप्रेशन ऑफ इन्ट्रेस्ट मागवून कार्यवाही करावी.किती बँकेत खाते आहे रेट ऑफ इन्ट्रेस किती सर्व माहिती या समितीला देण्यात यावी. |
| श्री.समीर राजूरकर | :शहरात जवळपास 150 पॅथॉलाजी आहे पॅथॉलॉजीस्ट यांचा नियमाप्रमाणे फक्त शिक्का मारला जातो ते तपासणी करीत नाही अशा किती पॅथॅलाजी आहे.डीएलएमटी सीएलएमटी झालेले मुले पॅथॅलॉजी मध्ये डॉक्टर ऐवजी ते तपासणी करतात |
| वैद्यकीय अधिकारी | या बाबत सध्या माहिती नाही सर्व माहिती एकत्रित करून दिली जाईल. |
| मा.सभापती | :शहरात अशा किती पॅथॅालॉजी आहेत तेथे एमडी झालेले डॉक्टर असतात यांचा शिक्का असतो ते तपासणी करीत नाही याची माहिती घेवून पुढील बैठकीत देण्यात यावी. |
| श्री.विजेंद्र जाधव | :सिध्दार्थ उद्यानमधील जे उत्पन्न येते त्यात आऊटसोर्सींगचे काम करावे असे या सभागृहाने प्रशासनाला आदेशीत केले होते काय कार्यवाही केली. |
| शहर अभियंता | :सिध्दार्थ गार्डन येथील जे तिकीटाच्या माध्यमातून उत्पन्न येते सार्स सोर्सीग करावे असा निर्णय घेतला होता या संदर्भात मा.आयुक्तांकडे संचिका आहे मंजूरी मिळतास समिती समोर आणले जाईल. |
| मा.सभापती | :फक्त ग्रीनरी करावे कुठल्याही प्रकारचे कन्स्ट्रक्शन करू नये प्रशासनाचे म्हणणे तरतूद नाही सभागृहाचे म्हणणे आहे की जे सिध्दार्थ उद्यानमधून उत्पन्न होते ते तेथील कामासाठी वापरावे असे करू शकतो का ? |
| मुख्यलेखाधिकारी | :होय होवू शकते. |
| शहर अभियंता | : असे करता येत असेल तर जे उत्पन्न येते ते स्वतंत्र अकाऊंटमध्ये जमा करावे लागेल.पेमेन्ट वेळेवर देता आले पाहिजे |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहर अभिंयता यांनी टेक्नीकली बाजू बघावी. अंदाजपत्रक आलेले दर बरोबर आहे का हे बघावे.या कामाची गरज आहे का हे लेखा विभागाने लिहू नये ज्या त्या अधिकारी-यांनी त्यांचे काम करावे. |
| मा.सभापती | :सिध्दार्थ उदयानचे जे उत्पन्न येते त्यातून शहरातील जे उदयानमध्ये ग्रीनरी नाही तेथे फक्त ग्रिनरी करावी बांधकाम करायचे नाही तो परीसर चांगला राहावा व लहान मुलासाठी छोटीशी काही प्रमाणात खेळणी असावी 1 ते |

1.25 कोटी उत्पन्न येते दर वर्षी 10-10 उद्यान विकसीत केले तर 4-5 वर्षात शहरातील सर्व उद्याने विकसीत होतील.

श्री.गिरजाराम हाळनोर :शहरात झाडांच्या फांदया तोडण्याच्या नावाखाली पुर्ण झाडाची कत्तल केली जाते लाईन तारा असेल तेवढी फांदी तोडण्यास हरकत नाही.झाडे नसल्याने पाऊस पडत नाही पाण्याचा थेंब नाही सर्रास कत्तल होते थांबवावे.शहरात कुठे अशी कत्तल होत असेल तर मनपाचे कोणतेही कर्मचारी असेल त्यांनी थांबविले पाहिजे.

मा.सभापती :शहरातील झाडाची अनावश्यकरित्या कत्तल होणार नाही याची उद्यान विभागाने दखल घ्यावी व ज्या त्या भागात जे जे राहतात अधिकारी कर्मचारी राहतात त्यांचेकरीता एक परीपत्रक काढून झाडाची कत्तल होणार नाही याची सर्वांनी दखल घ्यावी.

श्री.मो.मुजीबुद्यीन :कोणकोणत्या रस्त्याचे पॅचवर्क करण्यात आले.

शहर अभियंता : 6 प्रभागात 6 निविदा काढून जे गणपती विर्सजनाचे रस्ते होते ते तातडीने पॅचवर्क करण्यात आले मार्च पर्यंत जे वर्षभरासाठी पॅचवर्कचे काम चालणार आहे त्या बाबतीत निविदा मंजूरीसाठी स्थायी समितीकडे विषय येईल मंजूर झाल्यानंतर लगेच काम सुरू होईल.

श्री.नारायण कुचे :डिफर पेमेंन्ट वर काम केलेल्या रस्त्याचे पॅचवर्क केले का अशा रस्ते किती दिवस पुन्हा दुरूस्ती करण्याची गरज पडत नाही किती दिवसाची मुदत असते या संदर्भात कमेटी नियुक्त केली अहवाल आला का अशा रस्त्यावर पॅचवर्क करण्याची वेळ येते तर डिफर पेमेंन्टवर झालेले काम निष्कृष्ठ दर्जाचे होते का जिल्हाधिकारी कार्यालया समोर पॅचवर्क केले

शहर अभियंता :डिफर पेमेंन्टवर काम केलेल्या रस्त्यावर पॅचवर्क केले नाही.जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्ता डिफर पेमेंन्टवर केलेला नाही त्या व्यतिरिक्त ते काम होते.

श्री.नारायण कुचे :डिफर पेमेंन्टवर केलेल्या रस्त्या बाबत चौकशी समितीचा अहवाल येणार त्यानंतर पेमेन्ट करणार असे ठरले होते अहवाल आला का ? माझ्या वार्डात गणपती विसर्जन रस्त्यावर डांबर टाकले परंतु मातीचे ढीग संबधीत ठेकेदाराने तसेच ठेवले शहर अभियंता यांना माहिती दिली दुसरे व्यक्तीकडून ते उचलली.यावरून डिफरचे कामे कशी होत आहे लक्षात येते.

श्री.रेणुकादास वैद्य :डिफर पेमेंन्ट,रेग्यूलर ,अतिक्रमण रस्त्यावरील असे एकूण दरवर्षी डाबरीकरणाची 140-150 कोटीची कामे होतात. पुन्हा पॅचवर्क करणार गणेश विसर्जन झाले पॅचवर्कची कामे केली. आता पुन्हा 2.75 कोटीची पॅचवर्कची कामे कुठे करणार आहे.

शहर अभियंता :संचिका पाठवून दिली जाईल त्यामध्ये कोणत्या रस्त्याची कामे होणार हे दिले

श्री.रेणुकादास वैद्य :2.75 कोटीचे पॅचवर्क करणार त्यावेळी ठरविले असेल कोणते रस्ते आहे कोठून कुठपर्यत करणार माहिती दयावी.

श्री.नारायण कुचे :एखादा रस्त्याचे सहा महिण्यापूर्वी काम होते पुन्हा त्यावर पॅचवर्क होते संबधीत ठेकेदाराची जबाबदारी किती वर्षासाठीची असते.

मा.सभापती :डिफर पेमेंन्टवर झालेल्या रस्त्याची तपासणी करून अहवाल सादर करणे तसेच पॅचवर्क होत असलल्या रस्त्याची स.सदस्यांना माहिती देण्यात यावी व डिफर पेमेंन्टवर झालेला रस्ता तीन वर्षाच्या आत खराब होत असेल तर

संबधीत ठेकेदाराकडून त्या रस्त्यावरील दुरूस्तीचे काम विनामुल्य करून घ्यावे.

**श्री.समीर राजूरकर** :टीव्ही सेन्टर चौक व परीसरातील रस्त्यावर टप-या हातगाडया हटविण्या संदर्भात पोलीस विभागाचे पत्र आले मनपाने कार्यवाही केली नाही.

**प्रशासीय अधिकारी** : या संदर्भात दोन दिवसात कार्यवाही होईल.

**मा.सभापती** :या बाबत त्वरीत कार्यवाही करावी तसेच वेदांतनगर भागातही अनधिकृत बांधकाम बाबत कार्यवाही करावी

**प्रशासकीय अधिकारी** :वेंदातनगर येथील बांधकामा संदर्भात मा.आयुक्त यांनी सुनावणी घेण्याचे आदेशीत होते त्यानुसार कार्यवाही केली मंजूरीसाठी संचिका मा.आयुक्ताकडेच आहे.दोन दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :शहानुरवाडी येथील चौपाटीचा विषय प्रत्येक बैठकीत मांडतो त्यास कोणाची एनओसी घ्यावी लागणार कार्यवाही का होत नाही.

**प्रशासकीय अधिकारी** : संबधीतास नोटीसा दिल्या होत्या मुदत संपली आता कार्यवाही.3 दिवसात कार्यवाही होईल.

**श्री.अक्रम खॉन** :पीरबाजार ठेका किती दिवसासाठी दिला आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सोमवारला 4-5 दिवस बाकी आहे शहानुरवाडी येथेच एकाच ठिकाणी बाजार भरावा याची दखल घ्यावी.या सभागृहाचा निर्णय आहे अमलबजावणी व्हावी.

**मा.सभापती** :शहानुरवाडी येथेच सोमवार पासून बाजार भरला पाहिजे याची अमलबजावणी करावी.

**श्री.नारायण कुचे** :सारंग सोसायटीमधील ओपनस्पेसची जागा प्रशासकीय अधिकारी यांनी तेथील अनधिकृत असलेले एक-दोन सेटर काढले बाकी तसेच आहे.

**प्रशासकीय अधिकारी** :महापालिकेची ओपनस्पेस आहे.काही सेटर तोडले 6 दुकाने झाली ते लवकरच काढणार आहोत.

**श्री.विजेंद्र जाधव** :पडेगाव भागात व गायराण जमिनीवर अनधिकृत प्लॉटींग व बांधकाम चालू आहे अशी कामे कोठे चालू आहे यादी देणार होते दिली नाही.

**प्रशासकीय अधिकारी** :2 बेसमीटची कामे होती 21 कामे थांबविली 147 परवानगीची कामे चालू होतीसंबधीतास नोटीसा दिली आहे पुढील कार्यवाही लवकरच होईल गणपती उत्सव असल्यामूळे कार्यवाही थांबली आहे. 60 एकरवरील कार्यवाही या पूर्वी केली होती.सुविधा केंद्रातून सात/बारा मिळाल्यानंतर लगेच कार्यवाही केली जाईल.

**मा.सभापती** :पडेगाव हर्सुल, मिटमिटा भागात अनधिकृत होत असलेल्या बांधकामाची प्लॉटींग धारकावर कार्यवाही करणे व माहिती देणे तसेच सारंग सोसायटीतील ओपनस्पेसवर झालेल्या बांधकामा बाबत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** :बोगस भोगवटा प्रमाणपत्राबाबत पेपरला आले सत्य असेल तर तसे वृत्तपत्रात महापालिकेच्या माध्यमातून दयावे.माहिती दयावी.

**सहा.संचालक(न.र.)** :दै.वृत्तपत्रात आलेल्या बातमी नुसार आयकर विभागाने सुध्दा एक पत्र देवून हे खरे आहे का म्हणून विचाराणा केली भोगवटा प्रमाणपत्र महापालिकेनेच दिले आहे ते बरोबर आहे की चूक आहे याची शहानिशा करून कळविण्यात येईल असे पत्र देवून कळविले आहे त्याची शहानिशा करण्यासाठी मला व

तांत्रिक कक्ष प्रमुख श्री. काझी यांचेकडे दिले आहे.अंतिम स्टेजला रिपोर्ट आहे अंतिम झाल्यानंतर सादर करण्यात येईल.

श्री.समीर राजूरकर :एखादयाने बांधकाम परवानगी धेतली कम्प्लीशन घेतले नसतांना पुन्हा त्यांना चेंज करायचे असल्यास परवानगी देता येते का ?

सहा.संचालक(न.र) :बांधकाम परवानगी 3 वर्षाच्या मुदतीतील असेल तर देता येते.

श्री.बाळासाहेब मुंडे :किती बांधकाम परवानगीसाठी अर्ज दाखल झाले आहे प्रलंबीत किती आहे माहिती दयावी.

सहा.संचालक (न.र) :पुढील बैठकीपर्यंत माहिती दिली जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य : 3-4 महिण्यापासून वृत्तपत्रात नगररचना विभागाच्या संदर्भात छापून येते.या विभागाचे कन्ट्रोल आहे की नाही. काय काम होते माहिती द्यावी.जर वृत्तपत्रात चूकीचे येत असेल तर त्याचा खुलासा करण्याची जबाबदारी संबधीत अधिकारी यांची असते. नसता यांचा अर्थ ज्या बातम्या येतात त्या बरोबर आहेत का.

सहा.संचालक (न.र) :या विभागाकडून बातम्या दिल्या जात नाही बातम्या देणेवर कन्ट्रोल नाही.आयकर आयुक्त यांचेकडून आलेले पत्रानुसार त्या प्रकरणाची शहानिशा करण्याकरीता कमेटी नेमली अंतिम निष्कर्ष झाल्यानंतर खुलासा करता येईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :गुंठेवारीतील लोकांनी पैसे भरणा केले त्यांना प्रमाणपत्र मिळत नाही.

सहा.संचालक(न.र) :पर्टीकुलर केसेस सांगावे कार्यवाही करता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :गुंठेवारीतील लोकांना पहिले चलन दिले पैसे भरून घेतले अंतिम स्टेपला प्रकरण असते लोक येतात त्यावर अधिकारी सांगतात देता येत नाही हे योग्य नाही.किमान घेतलेले पैसे परत करावे.

श्री.मो.मुजीबोद्यीन :चिश्चिया कॉलनी भाग गुंठेवारीमध्ये रेग्यलर केला जात नाही.

कक्ष प्रमुख (गुंठेवारी) :गुंठेवारीचे पहिले चलन वार्ड कार्यालयाकडून देतो नंतर संचिका दाखल करून घेतो तशी कायद्यात तरतूद .त्या संचिकेची तांत्रिक छाननी होते मंजूर झाली तर दुसरे चलन भरून घेतो.ज्यांची संचिका मंजूर झाली नाही अशांनी जे जागेवर बांधकाम केले ते निष्काशित केल्यानंतर पैसे परत करता येईल.2001 नंतरची बांधकाम निष्काशित करण्याशिवाय पर्याय नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :एका संस्थचे रजिस्टेशन 2004 चे लेआऊट गुंठेवारीत मंजूर केला.600,1200 स्क्वेअर फुटची जागा असेल तर त्यास गुंठेवारीचे सर्व नियम लागू 2 एकर जागा असेल तर त्यास गुंठेवारीचे नियम लागू नाही.असे 3-4 लेआऊट गुंठेवारीमध्ये मंजूर झाले गरीबाचे 600 फुटाचे घर रेग्यूलर करण्यासाठी कागदपत्राची मागणी होते जी ते लोक देवू शकत नाही अधिकारी यांनी त्यांचा मोबाईल चालू ठेवावा. जनतेची सेवा करण्यासाठी काम करतो लक्ष असावे.काम करण्याची इंच्छा नसेल तर अशा अधिका-यांचा चार्ज काढावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :गुंठेवारीचे संचिका का थांबवून आहे

गुंठेवारी , कक्ष प्रमुख :2001 च्या नंतरच्या जास्तीत जास्त संचिका आहेत.

श्री.समीर राजूरकर :कोणते कागदपत्राची पुर्तता झाली नाही संबधीताना माहिती दयावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :गुंठेवारीमध्ये कोणते ले-आऊट मंजूर केले पुढील बैठकीत माहिती दयावी.

मा.सभापती : गुंठेवारी भागातील घरे नियमीत करणे बाबत योग्य ती कार्यवाही करणे तसेच गुंठेवारी अंतर्गत लेआऊटला दिलेली मंजूरी बाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.पायलट प्रोजेक्ट बाबत काय कार्यवाही केली.

कार्य.अभियंता श्री.सिंकदर अली: मागील वेळस आपण बघीतले ते फायनल झाले त्यानंतर चेन्नई कंपनीचे तीन फिंटींग घेतले

श्री.रेणुकादास वैद्य :काल विमान तळा कडून येतांना बघीतले उड्डाण पुलावरील सर्व लाईट बंद पायलट प्रोजेक्टची ही परीस्थिती असू नये.

कार्य.अभियंता(विद्युत) :कार्यवाही टेंडर प्रोसेस मध्ये 2-3 लाईट फिटींग घेतल्या लॅक्स लेवल बघायची आहे ते 50 मीटर पेक्षा जास्त येत आहे.

मा.सभापती : पायलट प्रोजेक्ट धर्तीवर लाईट बसविणेची कार्यवाही ताबडतोब करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :22 कोटी शासनाकडून आले कशासाठी दिले आहे.

कार्य.अभियंता-(बीओटी):घरकूल योजनेसाठी पैसे आले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :यासाठी किती रक्कम आली किती कमी पडत आहे जास्तीचे लागणारी रक्कम शासनाकडे मागणी केली का कितीचे धर बांधून देणार काय उपाययोजना केली.

कार्य.अभियंता-(बीओटी):269 स्क्वे.फुटचे घर बांधून देणार ही योजना महाराष्ट्र मध्ये कुठेही नाही ही महापालिका राबवीत आहे. एकात्मिक गृहनिर्माण विकास योजना ही 80 हजाराची असून दुसरी रमाई आवाज योजना आहे तीही 269 स्क्वे.फुटाची असून 2 लक्षची आहे यात अनुसुचित जाती नवबौध्द लोक येतात त्यात 90 टक्के ते लोक आहेत ते सर्व रमाई आवास योजनेत येत आहे.2लक्ष मध्ये घर होत नाही शासन संबधीत नाशिकचे आयुक्त यांना कळविले उत्तर आले नाही.

श्री.समीर राजूरकर :22 कोटीतून किती खर्चकेले.

कार्य.अभियंता(बीओटी):2 कोटी खर्च झाले 20 कोटी शिल्लक आहे सर्व प्रोसेस केली नोटीसेस लाभार्थीला देण्यात आलेल्या आहे.हे जीआर असून मा.आयुक्त नाशिक यांना पैसे वाढवून देण्याचा अधिकार नाही हा विषय कॅबीनेट मध्ये जाणार त्यानंतर कार्यवाही होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :2 लक्षमध्ये धर होत नाही शासन पैसे वाढवून देणार नाही गरीबांना घर मिळाले पाहिजे त्यासाठी मधला मार्ग काढून कार्यवाही व्हावी.

कार्य.अभियंता(बीओटी):या संदर्भात सर्वसाधारण सभेत प्रस्ताव दिला होता निविदा मंजूर झाली परंतु वरील 60 हजार प्रत्येक घरामागे कोण देणार म्हणून कार्यवाही थांबली

मा.सभापती :जीटीएल कंपनीवर एलबीटी लागू करावा शासनाचे आदेश आहे काय कार्यवाही केली.महापालिकेला वेळेवर लाईट बील भरावे लागते.

श्री.नारायण कुचे :3 कोटी जवळपास जीटीएल कंपनीला मनपा लाईट बील देते जीटीएल कंपनी एलबीटी भरत नसेल तर लाईटबील देण्याचे थांबविले पाहिजे.

श्री.समीर राजूरकर :एलबीटी भरणार नसेल तर महापालिका लाईटबील व व्याज भरणार नाही असे पत्र जीटीएल ला पाठवावे.

श्री.रेणुकादास वैद्य :एलबीटीची रक्कम भरावी वेळेवर भरणा केली नाही तर व्याज लावू तसे जीटीएलला पत्र दयावे ते ज्या दराने व्याज लावतात त्याप्रमाणे व्याज आकारणी करू कळवावे.

**मा.सभापती** :मा.आयुक्तांची मान्यता घेवून जीटीएलला एलबीटी भरण्या बाबत पत्र पाठवावे. शासनाचे आदेश आहे त्याप्रमाणे एलबीटी वसूल होईल दखल घ्यावी.

**मा.सभापती** :शहागंज ते गुलमंडी तसेच क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावरील पोल सिप्टींग बाबत काय कार्यवाही केली.

**उपअभियंता(विद्युत)** शहागंज ते गुलमंडी रस्त्यावरील काम करणे बाकी आहे 25 लक्ष संबधीत एजन्सील दिले आहे. प्रस्ताव मंजूरीसाठी येईल.रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक रस्त्या तील पोल सिप्टीग बाबत निविदा प्रक्रिया चालू आहे कोटेशन आले नोटीस तयार आहे 15 दिवस लागतील.

**मा.सभापती** :रेल्वेटेशन ते क्रांतीचौक रस्त्याचे काम सुरू होणार आहे पुन्हा पोल सिप्टींगमुळे काम थांबवू नये त्यासाठी या रस्त्यावरील पोल हटविण्यासाठी काम करीत असलेल्या एजन्सीकडून काम करून घेण्यात यावे.

**श्री.समीर राजूरकर** :ॲक्शन पॉईन्ट घ्यावे.

**मा.सभापती** :श्री. मनोज मारवाडे यांना स्थायी समिती सभांचे इतिवृत्त नोंद घेणेसाठी स्वतंत्र कार्यभार देणे या बाबत काय कार्यवाही केली.

**उपआयुक्त (प्र)** :त्यांचेकडे लघुटंकलेखकाचे काम करण्या बाबत अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे आता एकूण 7 इतिवृत्तात दिले आहे.

**श्री.समीर राजूरकर** : इतिवृत्त दिले मागिल बॉडीचे आहेत. आमच्या कार्यकाळातील नाही महत्वाच्या सभांचे इतिवृत्तांत दिले नाही.

**मा.सभापती** :लवकरात लवकर इतिवृत्तात देण्यात यावे.तसेच शहरात होत असलेले अतिक्रमणा बाबत यादी देण्यात यावी.

**श्री.समीर राजूरकर** :औषध फवारणी केली जाते आऊटफुट काहीच निघत नाही.वाटप कसे केले जाते किती स्टॉक आहे माहिती द्यावी.

**जीवशास्त्रज्ञ** :129 लीटरचा स्टॉक आहे. आता प्रत्येक एसएफ डब्ल्यू यांना औषध देतो सदर ठिकाणी ते जात नव्हते म्हणून आता बंद केले. पत्र देऊन स्टोअर मधून औषध घेणेस सांगितले आहे.

**श्री.समीर राजूरकर** :ॲबेट असेल किंवा जी औषध फवारणी करतो त्याचा वापर 10 टक्के सुध्दा होत नाही तपासणी करण्याची गरज आहे.

**मा.सभापती** :असा प्रकार होत असेल तर संबधीतावर कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. 62 :</u>** (विषय क्र. 54 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/09/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : विषय स्थगित करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 63 :</u>**

मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका प्राथमिक शाळा पैठणगेट करिता सेक्रेटरी बागवान जमात, पैठणगेट, औरंगाबाद यांची इमारतीतील एकुण आठ खोल्या शाळेसाठी रू.1646/- दर माहप्रमाणे दिनांक 18/06/2003 रोजी पासून भाडे तत्वावर घेण्यात आलेली आहे. सदरील शाळेच्या भाडे करारनाम्यात सदरील जागेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी मनपा कार्यालयाने

**अदा करणे आहे व सदर जागेत लाईटची व्यवस्था नाही, असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार तेथे विद्युत व्यवस्था नव्हती. परंतु विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय दूर व्हावी व विद्यार्थ्यांना लाईट व पंख्याची सोय करण्याकरीता तत्कालीन मुख्याध्यापकांनी संबंधीत इमारत मालकास शाळेच्या खोलीमध्ये स्वतंत्र विद्युत कनेक्शन घेण्यास सांगितले व येणारे विद्युत देयक स्वत: व शिक्षकांनी मिळुन भरले. सद्यस्थितीत खुप जास्त रक्कमेचे विद्युत देयक येत असल्यामुळे शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक व शिक्षकांना विद्युत देयक भरणे अशक्य असल्याने महानगरपालिकेने सदरील विद्युत देयक भरणा करावा अशी विनंती शाळेने केलेली आहे. तथापी सद्यस्थितीत प्राप्त रक्कमेचे देयक महानगरपालिकेने भरणेबाबत शाळेने विनंती केली आहे.**

**सदरील विद्युत देयक इमारत मालक (सेक्रेटरी बागवान जमात) श्री.अब्दुल रहेमान अब्दुल चौधरी यांचे नांवे आहे. करीता सद्यस्थितीत प्राप्त देयक रक्कम रू.5920/- महानगरपालिकेने अदा करणेस्तव व सुधारीत करारनामा करून त्यात सदरील जागेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कराप्रमाणे विद्युत देयकही महानगरपालिकेने शाळा भाडे तत्वावर चालु असेपर्यंत भरावे अशा दुरूस्तीसह सुधारीत करारनामा करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| **मा.सभापती** | **:प्रशासनाने खुलासा करावा.** |
| **प्र.शिक्षणाधिकारी** | **:महापालिकेच्या पैठणगेट उर्दु शाळेसाठी सेक्रेटरी बागवान जमात यांचेकडून 2003 पासून आठ खोल्या भाडयाने घेतल्या तेंव्हा तेथे विद्युत कनेक्शन नव्हते करारनामा केला तेंव्हा मालमत्ता कर व पाणीपट्टी मनपा ने अदा करणे असे होते परंतु विद्यार्थ्याची शिक्षणाची गैरसोय दूर व्हावी तेथे् लाईट व पंख्याची सोय करण्याकरीता तत्कालीन शिक्षकांनी एकमेकांची सहमती घेवून विद्यूत कनेक्शन घेतले महापालिकेने त्यांचे बिल भरले परंतु आता विद्युत देयक जास्त येत असल्यामूळे ते थकीत राहिल्यामूळे कनेक्शन तोडण्यात आले** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **: मनपाच्या अनेक इमारती बांधून आहे वापर नाही तेथे अशा शाळा शिप्ट करता येतील का ते बघावे इमारतीचे भाडे देतो लाईटबील त्यांनी भरावे.** |
| **प्र.शिक्षणाधिकारी** | **:लाईट बील त्यांनी भरावे म्हणून भाडे देवू शकतो.** |
| **श्री.समीर राजूरकर** | **:खोल्या भाडयाने घेतल्या त्यावेळी तेथे लाईट असावी याचा विचार तेव्हा का केला नाही. एकूण खोल्या किती आहे भाडे किती.** |
| **प्र.शिक्षणाधिकारी** | **:एकूण खोल्या आठ व भाडे 1646 रू देतो.** |
| **मा.सभापती** | **:विषय मंजूर** |

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिका प्राथमिक शाळा पैठणगेट करिता इमारत मालक (सेक्रेटरी बागवान जमात) श्री.अब्दुल रहेमान अब्दुल चौधरी यांच्या इमारतीतील मनपा शाळेसाठी भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या एकुण आठ खोल्यांचे प्राप्त विद्युत देयक रक्कम रू.5920/- महानगरपालिकेने अदा करणेस व सुधारीत करारनामा करून त्यात सदरील जागेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कराप्रमाणे विद्युत देयकही महानगरपालिकेने शाळा भाडे तत्वावर चालु असेपर्यंत भरावे अशा दुरूस्तीसह सुधारीत करारनामा करणेस तसेच मनपाच्या अनेक बांधलेल्या इमारती आहे तेथे अशा शाळा शिप्ट कराव्यात. यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.**

| | |
|---|---|
| नगर सचिव<br>महानगरपालिका औरंगाबाद | सभापती-स्थायी समिती<br>महानगरपालिका औरंगाबाद |

**नगरसचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा- कार्यक्रम पत्रिका क्रमांक ( 15 )

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 43 (1) व त्यास अनुसरून अनुसूची-ड, प्रकरण-2 चे नियम क्रमांक 3 आणि सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक 66 (1) अन्वये.)

दिनांक : 07/10/2012

**गुरूवार दिनांक 11 ऑक्टोबर 2012 रोजी सकाळी 11.30 वाजता "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यात आलेले असून या सभेत खालील विषय विचाराधीन आहेत. करीता या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**

**विषय क्र. 62 :** **(विषय क्र. 54 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 28/09/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)**

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**विषय क्र. 63 :**

**मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका प्राथमिक शाळा पैठणगेट करिता सेक्रेटरी बागवान जमात, पैठणगेट, औरंगाबाद यांची इमारतीतील एकुण आठ खोल्या शाळेसाठी रू.1646/- दर माहप्रमाणे दिनांक 18/06/2003 रोजी पासून भाडे तत्वावर घेण्यात आलेली आहे. सदरील शाळेच्या भाडे करारनाम्यात सदरील जागेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी मनपा कार्यालयाने अदा करणे आहे व सदर जागेत लाईटची व्यवस्था नाही, असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार तेथे विद्युत व्यवस्था नव्हती. परंतु विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय दूर व्हावी व विद्यार्थ्यांना लाईट व पंख्याची सोय करण्याकरीता तत्कालीन मुख्याध्यापकांनी संबंधीत इमारत मालकास शाळेच्या खोलीमध्ये स्वतंत्र विद्युत कनेक्शन घेण्यास सांगितले व येणारे विद्युत देयक स्वत: व शिक्षकांनी मिळुन भरले. सद्यस्थितीत खुप जास्त रक्कमेचे विद्युत देयक येत असल्यामुळे शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक व शिक्षकांना विद्युत देयक भरणे अशक्य असल्याने महानगरपालिकेने सदरील विद्युत देयक भरणा करावा अशी विनंती शाळेने केलेली आहे. तथापी सद्यस्थितीत प्राप्त रक्कमेचे देयक महानगरपालिकेने भरणेबाबत शाळेने विनंती केली आहे.**

**सदरील विद्युत देयक इमारत मालक (सेक्रेटरी बागवान जमात) श्री.अब्दुल रहेमान अब्दुल चौधरी यांचे नांवे आहे. करीता सद्यस्थितीत प्राप्त देयक रक्कम रू.5920/- महानगरपालिकेने अदा करणेस्तव व सुधारीत करारनामा करून त्यात सदरील जागेचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कराप्रमाणे विद्युत देयकही महानगरपालिकेने शाळा भाडे तत्वावर चालु असेपर्यंत भरावे अशा दुरूस्तीसह सुधारीत करारनामा करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

**नगर सचिव**
**महानगरपालिका औरंगाबाद**